राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता निश्चित करण्यात आलेली किमान गुणवत्तेची अट शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: ११ ऑगस्ट, २०१७

संदर्भ: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/ प्र.क्र.२१९/ तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५/०४/२०१७
४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक २१/०६/२०१७

प्रस्तावना :

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये पदविका व पदवी अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांकरीता पात्रतेसाठी अनुक्रमे इयत्ता १० वी / इयत्ता १२ वी मध्ये किमान ६० टक्के गुणांची अट घालण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये या योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पात्रतेकरीता ६० टक्के गुणांची अट शिथिल करण्यात आली आहे.

तसेच पदविकाधारक जे विद्यार्थी थेट द्वितीय वर्षाच्या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी पदविका अभ्यासक्रमांच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुणांऐवजी ५० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक असल्याची अट निर्धारीत केली आहे. या प्रवर्गातील उर्वरित अन्य विद्यार्थ्यांकरीता या योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी किमान ६० टक्के गुणांची अट अद्यापही कायम आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सर्व विद्यार्थ्यांकरीता या योजनेंतर्गत

लाभाच्या पात्रतेसाठी सध्या निर्धारित केलेली किमान ६० टक्के गुणांची अट शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सर्व विद्यार्थ्यांसाठी योजनेच्या लाभाकरीता पात्रतेसाठी निर्धारीत केलेली किमान ६० टक्के गुणांची अट ही शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शिथिल करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. यानुसार संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय व संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांनी याची नोंद घ्यावी. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता सदर शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी करावी.

२. सदर योजनेंतर्गत कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय आणि वैद्यकीय शिक्षण औषधीद्रव्ये या विभागांच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी लाभाच्या पात्रतेसाठी किमान ६० टक्के गुणांची विहित केलेली अट शिथिल करण्याबाबतचे आदेश या विभागांनी त्यांच्या स्तरावर तात्काळ निर्गमित करावेत.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक, ८२१/व्यय-५, दिनांक ९/८/२०१७ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धकरुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०८१११३०१३७०२०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dr.Kiran Patil Digitally signed by Dr.Kiran Patil Date: 2017.08.11 15:23:08 +05'30'

( डॉ. किरण पाटील )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (कृषि), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव (प.दु.म.), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सामाजिक न्याय व विकास विभाग, मंत्रालय, मुंबई